राज्यस्तरावर पुरुष व महिलांसाठी "छत्रपती शिवाजी चषक कबड्डी" स्पर्धेच्या आयोजनाबाबत.
सुधारित नियमावली

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२२९/१२)/क्रीयुसे-२,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : ३ नोव्हेंबर,२०१२**

**<u>वाचा</u> :- (१) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-१०९६/प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१, दिनांक २४ ऑक्टोबर,१९९७,**
**(२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-१०९९/प्र.क्र.२६७/क्रीयुसे-१, दिनांक २४ जानेवारी,२०००,**
**(३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-राक्रीधो-२००३/प्र.क्र.७५/क्रीयुसे-२, दिनांक ८ मार्च,२००४,**
**(४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीस्पर्धा-२०११/ प्र.क्र.४५/११/क्रीयुसे-२, दिनांक ३ जानेवारी,२०१२,**
**(५) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक-क्रीयुसे/छशिचकस्प/ (०९)/११-१२/का.४, दिनांक ७ जून,२०१२.**

**<u>प्रस्तावना</u> :-** महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ होण्यासाठी विविध खेळांच्या माध्यमातून युवा पिढीला खेळाकडे आकृष्ट करणे व त्यांच्यातील क्रीडा गुणांना वाव देणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात कबड्डीसारख्या देशी खेळाबाबत ग्रामीण व शहरी भागात विशेष आवड व आत्मियता आहे. कबड्डी हा खेळ महाराष्ट्रात सर्वत्र खेळला जातो. देशातील इतर राज्यात व देशाबाहेरही कबड्डी खेळाचा प्रचार व प्रसार करण्यात महाराष्ट्रात सिंहाचा वाटा आहे. राज्याची कबड्डी खेळातील कामगिरी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय आहे.

राज्यातील खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी यादृष्टीने उपरोक्त दिनांक २४.१०.१९९७ च्या शासन निर्णयान्वये राज्यात राष्ट्रीय स्तरावर पुरुष व महिलांसाठी शिवशाही चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून, उपरोक्त दिनांक २४.१.२००० च्या शासन निर्णयान्वये सदर स्पर्धा **छत्रपती शिवाजी** चषक कबड्डी स्पर्धा या नावाने आयोजित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच या स्पर्धेच्या आयोजनासाठी देण्यात येणा-या प्रतिवर्ष रु.२१.०० लाख या अनुदानामध्ये वाढ करुन

ते प्रतिवर्ष रु.५०.०० लाख एवढे करण्यास उपरोक्त दिनांक ३.१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, सदर राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणा-या संघांचा दर्जा तसेच या स्पर्धेमधील महाराष्ट्रातील खेळाडूंचा सहभाग अल्प असल्याने महाराष्ट्रातील खेळाडूंना या क्रीडा स्पर्धेचा फायदा होत नव्हता. त्यामुळे महाराष्ट्रातील खेळाडूंना प्रेरणा देण्यासाठी व त्यांना राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी यादृष्टीने तसेच कबड्डी खेळाडूंना व क्रीडाप्रेमी प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचे कौशल्य व खेळ पाहण्याची संधी मिळावी यासाठी स्पर्धेच्या आयोजनाच्या प्रचलित तरतूदीमध्ये सुधारणा करुन दरवर्षी राज्यस्तरावर पुरुष व महिलांसाठी कबड्डी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व त्याबाबत आता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**: शा स न नि र्ण य :** उपरोल्लेखित दिनांक २४.१०.१९९७ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्रात राज्यस्तरावर पुरुष व महिलांसाठी दरवर्षी "छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धा" आयोजित करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत असून, या स्पर्धेच्या सोबतच्या परिशिष्ट-"अ" मधील सुधारित नियमावलीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

तसेच छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धेसाठी सोबतच्या परिशिष्ट-"ब" अनुसार बाबनिहाय खर्चास तसेच परिशिष्ट-"क" अनुसार विविध समित्या गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत असून, संदर्भाधीन दिनांक ३.१.२०१२ च्या शासन निर्णयासोबतचे स्पर्धेच्या खर्चाच्या तपशीलाबाबतचे परिशिष्ट-"अ" रद्द करण्यात येत आहे.

२. या स्पर्धेसाठी होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष "२२०४-क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ-योजनेतर योजना-(३१)(०१)-छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धा-३१-सहाय्यक अनुदाने संगणक क्रमांक-(२२०४ २०४ ६)" याखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याअंतर्गत त्या त्या वर्षी केलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय सन२०१२-१३ या वर्षापासून आयोजित केल्या जाणा-या स्पर्धांसाठी लागू होईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra. gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा **संगणक सांकेतांक क्रमांक- २०१२११०३१५२०३६५४२१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहपत्र : परिशिष्ट-अ,ब व क

( कि. शां. परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
(२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
(३) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
(६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
(७) सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना, मुंबई (संचालनालयामार्फत),
(८) सरचिटणीस, विदर्भ कबड्डी संघटना, नागपूर (संचालनालयामार्फत),
(९) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(१०) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(११) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
(१२) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी,
(१३) मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१४) मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१५) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,
(१६) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

## **: परिशिष्ट-"अ" :**

## **शासन निर्णय क्रमांक- क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२२९/१२)/क्रीयुसे-२, दिनांक ३ नोव्हेंबर,२०१२ चे सहपत्र**

## **छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी** क्रीडा स्पर्धेची नियमावली

**नियम-१** :- **शीर्षक** :- या नियमांना छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी **क्रीडा स्पर्धा नियम,** २०१२ असे संबोधण्यात यावे.

**नियम-२** :- **उद्दिष्ट** :- राज्यातील कबड्डी खेळाच्या खेळाडूंना प्रेरणा मिळावी व त्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी तसेच त्यांना व क्रीडाप्रेमी प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचे कौशल्य व खेळ पाहण्यास मिळावा असे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे.

**नियम-३** :- **स्पर्धेचे स्वरुप व निकष** :- (अ) या स्पर्धा दरवर्षी राज्यस्तरावर पुरुष व महिलांसाठी राष्ट्रीय कबड्डी महासंघाच्या नियमाप्रमाणे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना/विदर्भ कबड्डी संघटना यांच्यामार्फत आयोजित करण्यात येतील.

(ब) या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना व विदर्भ कबड्डी संघटनेने त्या त्या वर्षी आयोजित केलेल्या वरिष्ठ गट (सिनिअर) क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी झालेले गुणवत्तेनुसार अनुक्रमे १२ संघ व ४ संघ असे एकूण पुरुषांचे १६ व महिलांचे १६ संघ सहभागी होतील.

(क) प्रत्येक संघात १२ खेळाडू, १ व्यवस्थापक व १ मार्गदर्शक असे एकूण १४ सदस्य राहतील.

(ड) स्पर्धेचा कालावधी एकूण ७ दिवसांचा राहील. (प्रत्यक्ष स्पर्धा ५ दिवस, एक दिवस स्पर्धेपूर्वी व एक दिवस स्पर्धेनंतर)

**नियम-४** :- **पुरस्काराचे स्वरुप** :- (अ) या स्पर्धेतील विजेत्या पुरुष व महिला संघास छत्रपती शिवाजी चषक देण्यात येईल. हा चषक फिरता असेल तथापि, प्रथम, द्वितीय व तृतीय प्राविण्य संपादन करणा-या संघास त्या चषकाची प्रतिकृती व अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक देण्यात येईल.

(ब) साखळी सामने, उपउपांत्य फेरी, उपांत्य फेरी व अंतिम सामन्यातील विजयी व पराभूत संघास परिशिष्ट-"ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे रोख बक्षिसे देण्यात येतील.

(क) स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक व अधिका-यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजयी संघातील खेळाडूंना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येईल. सदर प्रमाणपत्रे जिल्हाधिकारी तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे / विदर्भ कबड्डी संघटनेचे सचिव (आयोजन सचिव) विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा व संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देण्यात येतील.

**नियम-५** :- **स्पर्धेसाठी आर्थिक तरतूद व स्पर्धेच्या खर्चाचा तपशील** :- या स्पर्धेसाठी प्रतिवर्षी रु.५०.०० लाख एवढी तरतूद करण्यात यावी. स्पर्धेतील खेळाडूंना रोख बक्षिस, चषकाची प्रतिपूर्ती,

मेडल, इत्यादी बाबींवर अपेक्षित खर्चाचा तपशील सोबतच्या परिशिष्ट-"ब" मध्ये देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे स्पर्धेसाठी बाबनिहाय खर्च करण्यात यावा.

**<u>नियम-६</u>** :- **<u>आहरण व संवितरण अधिकारी</u>** :- या स्पर्धेसाठी आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**<u>नियम-७</u>** :- **<u>आर्थिक व्यवहार पध्दती</u>** :- **(अ)** या स्पर्धेसाठी शासनाने मंजूर केलेली रक्कम रु.५०.०० लाख आयोजन समितीकडे अनुदान स्वरुपात देण्यात येईल व आयोजन समितीच्या नावे बँकेत खाते उघडून त्या खात्याचा व्यवहार जिल्हाधिकारी तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष यांच्या मान्यतेने कार्याध्यक्ष, आयोजन सचिव व संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा तथा कोषाध्यक्ष यांच्यापैकी दोघांच्या स्वाक्षरीने करण्यात येईल,

(ब) या स्पर्धा महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना / विदर्भ कबड्डी संघटना यांच्यामार्फत आयोजित करण्यात येत असल्याने परिशिष्ट-"ब" मध्ये दर्शविलेली रक्कम रु.५०.०० लाख परिशिष्ट-"क" मधील आयोजन समितीस अनुदान म्हणून देण्यात येईल,

(क) स्पर्धेचे आयोजन पूर्ण झाल्यानंतर आयोजन समितीने दोन महिन्याच्या आत मंजूर अनुदानाचे लेखा परीक्षण करुन अनुदान विनियोग प्रमाणपत्र, स्पर्धेच्या खर्चाचा अहवाल व स्पर्धेचा सविस्तर अहवाल क्रीडा व युवकसेवा संचालनालयास सादर करणे आवश्यक राहील. अनुदानाची काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती चलनाद्धारे शासनास परत करण्यात यावी,

(ड) अनुदानाव्यतिरिक्त अधिक खर्च झाल्यास तो आयोजन समितीने करावा,

(इ) शासनाने मंजूर केलेल्या अनुदान रकमेव्यतिरिक्त आयोजन समितीस अतिरिक्त आर्थिक निधी उभारता येईल.

**<u>नियम-८</u>** :- **<u>स्पर्धेसाठी गठीत करावयाच्या समित्या</u>** :- या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी गठीत करावयाच्या विविध समित्या परिशिष्ट-"क" प्रमाणे राहतील.

**<u>नियम-९</u>** :- **<u>स्पर्धा तांत्रिक बाबी</u>** :- स्पर्धेत भाग घेणा-या संघाची निवड, क्रीडांगणे, प्रत्यक्ष सामने इत्यादी बाबींची तांत्रिक जबाबदारी महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना / विदर्भ कबड्डी संघटना यांची असेल.

**<u>नियम-१०</u>** :- **<u>सर्वसाधारण व्यवस्था</u>** :- निवास व भोजन व्यवस्था, प्रेक्षक व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, प्रसिध्दी व अन्य व्यवस्थापकीय बाबींची जबाबदारी संबंधित समित्यांची असेल,

**<u>नियम-११</u>** :- **<u>स्पर्धेत भाग घेणारे संघ व त्यांच्यासाठी सुविधा</u>** :- या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व विदर्भ कबड्डी असोसिएशन यांनी त्या त्या वर्षी आयोजित केलेल्या राज्यस्तर वरिष्ठ गटाच्या क्रीडा स्पर्धेमधील गुणवत्तेनुसार अनुक्रमे प्रथम १२ क्रमांकाचे व प्रथम ४ क्रमांकाचे पुरुष व महिलांचे संघ सहभागी होतील. या संघांना दुस-या वर्गाचे रेल्वे भाडे अथवा ज्याठिकाणी रेल्वे उपलब्ध नसेल त्याठिकाणी जाण्या येण्याचे निमआराम बस भाडे देण्यात येईल. तसेच स्थानिक वाहतूक व्यवस्था

आयोजन समितीतर्फे पुरविण्यात येईल. निवास व भोजनाची मोफत व्यवस्था शासनाच्यावतीने आयोजन समितीमार्फत करण्यात येईल.

**<u>नियम-१२</u> :-** <u>सर्वसाधारण</u> **:- (I)** आयोजन समितीच्या पहिल्या बैठकीत स्पर्धेचे स्वरुप व अंदाजपत्रक मंजूर करुन घेण्यात येईल.

(II) छत्रपती शिवाजी चषक कबड्डी क्रीडा स्पर्धा ज्या जिल्ह्यात होईल त्या विभागाचे / जिल्ह्याचे संबंधित अधिकारी समितीचे सदस्य असतील.

(III) छत्रपती शिवाजी चषक कबड्डी क्रीडा स्पर्धा ज्यावर्षी विदर्भात होईल त्यावर्षी महाराष्ट्र कबड्डी संघटनेऐवजी विदर्भ कबड्डी संघटना कार्यरत राहील.

(IV) स्पर्धेसाठी नेमण्यात येणा-या तांत्रिक अधिका-यांचा प्रवास खर्च, निवास व भोजन खर्च, स्थानिक वाहतूक खर्च परिशिष्ट-"ब"मध्ये नमूद केल्यानुसार शासनाच्यावतीने आयोजन समितीतर्फे करण्यात येईल. दैनंदिन कार्यालयीन कामासाठी आवश्यक तो कर्मचारीवर्ग आयोजन समितीस नियुक्त करता येईल.

(V) छत्रपती शिवाजी चषक कबड्डी क्रीडा स्पर्धेचे आयोजन शक्यतो प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यात करण्यात यावे. तत्पूर्वी संघटनांनी त्यांच्या राज्यस्तर सिनिअर क्रीडा स्पर्धेचे आयोजन पूर्ण करावे.

(VI) संघटनेने आयोजित केलेल्या वरिष्ठ गटाच्या क्रीडा स्पर्धेमध्ये ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग घेतलेला आहे अशाच खेळाडूंना स्पर्धेत प्रवेश देण्यात यावा.

एखादा खेळाडू आजारी असल्यास, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धा व प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेला असल्यास व इतर अत्यंत महत्त्वाच्या कामामुळे त्या खेळाडूंऐवजी त्याच जिल्ह्यातील गुणानुक्रमे राखीव खेळाडूस प्रवेश देण्यात यावा.

(VI) स्पर्धेचे आयोजन साखळी व बाद पध्दतीने करण्यात येईल.

(VII) परिशिष्ट-"ब" मधील खर्चाच्या बाबींमधील रु.५०.०० लाखाच्या मर्यादेत बक्षिसाच्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्या मान्यतेने इतर बाबींवर खर्च करता येईल.

**<u>नियम-१३</u>** :- <u>नियम शिथिल करणे / बदल करणे</u> :- या नियमावलीमधील कोणताही नियम शिथिल करणे त्यात अंशत: किंवा पूर्णत: बदल करणे, नवीन नियम समाविष्ट करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनास राहतील.

-------

**: परिशिष्ट-"ब" :**

**शासन निर्णय क्रमांक- क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२२९/१२)/क्रीयुसे-२, दिनांक ३ नोव्हेंबर,२०१२ चे सहपत्र**

**छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी** क्रीडा स्पर्धेच्या बाबनिहाय खर्चाचा तपशील

| अ.क्र. | बाब | बाबनिहाय खर्च |
|---|---|---|
| १ | सहभागी संघ - १६ पुरुष व १६ महिला संघ असे एकूण ३२ संघ एकूण ३८४ खेळाडू प्रत्येक संघामध्ये १२ खेळाडू, १ क्रीडा मार्गदर्शक व १ व्यवस्थापक असा एकूण १४ जणांचा समावेश राहील. (१४x३२=४४८) | - |
| २ | सरपंच, पंच, अधिकारी व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संख्या अंदाजे १०० | - |
| ३ | स्पर्धेचा कालावधी एकूण ७ दिवस, ५ दिवस प्रत्यक्ष स्पर्धा, एक दिवस स्पर्धेपूर्वी व एक दिवस स्पर्धेनंतर | - |
| ४ | **प्रवास खर्च जाणे-येणे** :- खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना अंदाजे रु.५००/- प्रमाणे दुस-या वर्गाचे रेल्वे भाडे / ज्याठिकाणी रेल्वे उपलब्ध नसेल त्याठिकाणी जाण्यायेण्याचे निमआराम बसचे भाडे, शासकीय अधिकारी यांना शासन नियमाप्रमाणे (५००x५४८) | रु.२,७४,००० |
| ५ | खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी यांचा भोजन खर्च दरदिवशी प्रत्येकी रु.२५०/- प्रमाणे ७ दिवस (२५०x५४८x७) | रु.९,५९,००० |
| ६ | खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी यांचा निवास रु.१५०/- प्रमाणे ७ दिवस (१५०x५४८x७) | रु.५,७५,४०० |
| ७ | छत्रपती शिवाजी चषक प्रतिकृतीचा, मेडलचा खर्च<br>पुरुष प्रथम क्रमांक : रु.२०,०००<br>महिला प्रथम क्रमांक : रु.२०,०००<br>पुरुष द्वितीय क्रमांक : रु.१५,०००<br>महिला द्वितीय क्रमांक : रु.१५,०००<br>पुरुष तृतीय क्रमांक : रु.१०,०००<br>महिला तृतीय क्रमांक : रु.१०,००० | रु.९०,००० |

| | | |
|---|---|---|
| ८ | **<u>रोख बक्षिसे</u>**<br>(अ) साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील विजयी संघाला रु.५०००/- प्रमाणे<br>पुरुष ४ गट व महिला ४ गट एकूण - ८ गट<br>८ गट X ६ सामने - एकूण ४८ सामने X रु.५०००/- प्रमाणे | रु.२,४०,००० |
| | (ब) साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील पराभूत संघाला रु.२५००/- प्रमाणे<br>पुरुष ४ गट व महिला ४ गट एकूण - ८ गट<br>८ गट X ६ सामने - एकूण ४८ सामने X रु.२५००/- प्रमाणे | रु.१,२०,००० |
| | (क) उपउपांत्य फेरीतील प्रत्येक विजयी संघाला रु.२०,०००/- प्रमाणे<br>पुरुष ४ गट व महिला ४ गट - एकूण - ८ सामने<br>एकूण ८ सामने X रु.२०,०००/- प्रमाणे | रु.१,६०,००० |
| | (ड) उपउपांत्य फेरीतील प्रत्येक पराभूत संघाला रु.१५,०००/- प्रमाणे<br>पुरुष ४ गट व महिला ४ गट - एकूण - ८ सामने<br>एकूण ८ सामने X रु.१५,०००/- प्रमाणे | रु.१,२०,००० |
| | (इ) उपांत्य फेरीतील प्रत्येक विजयी संघाला रु.५०,०००/- प्रमाणे<br>पुरुष २ गट व महिला २ गट - एकूण - ४ सामने<br>एकूण ४ सामने X रु.५०,०००/- प्रमाणे | रु.२,००,००० |
| | (फ) उपांत्य फेरीतील प्रत्येक पराभूत संघाला रु.२५,०००/- प्रमाणे<br>पुरुष २ गट व महिला २ गट - एकूण - ४ सामने<br>एकूण ४ सामने X रु.२५,०००/- प्रमाणे | रु.१,००,००० |
| | (ग) अंतिम विजयी संघाला रु.१,२५,०००/- प्रमाणे २ सामने | रु.२,५०,००० |
| | (ह) अंतिम उपविजयी संघाला रु.७५,०००/- प्रमाणे २ सामने | रु.१,५०,००० |
| | रोख बक्षिसे एकूण : | रु.१३,४०,००० |
| ९ | सरपंच, पंच, अधिकारी, संघटना प्रतिनिधी व शासकीय अधिकारी एकूण १०० यांना मानधन रु.५००/- प्रमाणे ७ दिवस (१००X५००X७) | रु.३,५०,००० |
| १० | क्रीडांगण तयार करणे व देखभाल खर्च (माती, पाणी, रोलर, चुना व इतर) | रु.१,००,००० |
| ११ | मैदानासाठी व स्पर्धेच्या कामासाठी २५ स्वयंसेवकांचे मानधन रु.२५०/- प्रमाणे ७ दिवस (२५०X२५X७) | रु.४३,७५० |

| | | |
|---|---|---|
| १२ | प्रेक्षक गॅलरी, क्रीडांगणावरील प्रकाश झोतासाठी व्यवस्था, विद्युत व्यवस्था, शामियाने, व्हीआयपी आसन व्यवस्था, निमंत्रितांची आसन व्यवस्था, स्टेज व इतर अनुषंगिक बाबींचा खर्च | रु.६,००,००० |
| १३ | **सादिल खर्च** :- उद्घाटन व समारोप, रोषणाई, प्रसिध्दी, बॅनर्स, साऊंड सिस्टीम, व्हिडीओ रेकॉर्डिंग व फोटो छपाई, झेरॉक्स, प्रमाणपत्र छपाई आवश्यक क्रीडा साहित्य, स्टेशनरी, संगणक/फॅक्स, टेलिफोन, वाहतूक खर्च व स्पर्धेच्या अनुषंगाने होणारा इतर खर्च इत्यादी | रु.६,६७,८५० |
| | | रु.५०,००,००० |

**: परिशिष्ट-"क" :**

**शासन निर्णय क्रमांक- क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२२९/१२)/क्रीयुसे-२, दिनांक ३ नोव्हेंबर,२०१२ चे सहपत्र**

**छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासंबंधात गठीत करावयाच्या विविध समित्या**

**छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे विविध समित्या गठीत करण्यात याव्यात :-**

(अ) **उच्चस्तरीय समिती (High Power Committee)**

सदर स्पर्धेचे सर्वसाधारण धोरण व संनियंत्रण करणे, स्पर्धेचे ठिकाण ठरविणे आणि स्पर्धेसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उच्चस्तरीय समिती नेमण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) | अध्यक्ष |
| २ | राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) | उपाध्यक्ष |
| ३ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| ५ | सचिव / प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य / विदर्भ राज्य कबड्डी असोसिएशन | सदस्य |
| ६ | आयुक्त / संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे | सदस्य सचिव |

(ब) **आयोजन समिती**

स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्याच्या दृष्टीने स्पर्धेच्या आयोजनासंदर्भात पूर्वतयारीसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्ह्याचे पालक मंत्री | अध्यक्ष |
| २ | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | स्थानिक आमदार | उपाध्यक्ष |
| ४ | शहराचे महापौर / नगराध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ५ | संबंधित जिल्हाधिकारी | कार्याध्यक्ष |
| ६ | महाराष्ट्र राज्य / विदर्भ कबड्डी असोसिएशनचे सचिव | आयोजन सचिव |
| ७ | संबंधित उपसंचालक (क्रीडा व युवकसेवा) | कोषाध्यक्ष |
| ८ | संबंधित जिल्हा कबड्डी संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी | संयुक्त सचिव |
| १० | महापालिका आयुक्तांचे / मुख्याधिकारी, नगरपालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | पोलीस आयुक्तांचे / पोलीस अधीक्षकांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| १३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १४ | महाविद्यालयाचे प्राचार्य (दोन) | सदस्य |
| १५ | जिल्हा क्रीडा परिषदेचे सदस्य (दोन) | सदस्य |
| १६ | जिल्हा परिषद सदस्य / नगरसेवक (दोन) | सदस्य |
| १७ | आकाशवाणी / दूरदर्शन प्रतिनिधी | सदस्य |

आवश्यकतेनुसार या समितीमध्ये विशेष निमंत्रक म्हणून सभासद घेण्याचा अधिकार अध्यक्षांना व कार्याध्यक्षांना राहील.

**उपसमित्या** :-

याशिवाय स्पर्धा यशस्वीरितीने पार पाडण्यासाठी आयोजन समितीच्या अधिपत्याखाली खालील उप समित्या नेमण्यात याव्यात :-

(१) तांत्रिक समिती (क्रीडांगण व सामने)

(२) निवास व्यवस्था समिती

(३) भोजन व्यवस्था समिती

(४) प्रसिध्दी व स्मरणिका समिती

(५) वाहतूक व्यवस्था समिती

(६) स्वयंसेवक समिती

(७) उद्घाटन / समारोप समारंभ समिती

(८) वैद्यकीय सेवा समिती

आयोजन समिती उपयुक्त ठरणा-या व्यक्तींची वरील उपसमित्यांमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करेल. तसेच आयोजन समितीस आवश्यकतेनुसार वरील उपसमित्यांमध्ये वाढ करता येईल.

--------